| MHKO190005712016 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | २६/०९/२०१६ |
| | नोंदणी दिनांक | :- | २६/०९/२०१६ |
| | निकाल दिनांक | :- | २१/०५/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस, |
| | | | ०९ ०३ २५ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी आर.डि.शिंदे)

**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – २१ मे, २०२६**

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१७२/२०१६)** **(नि.क्र.३२/खाली)**

गुन्हा नोंद क्र.५९/२०१६, पोलीस ठाणे राधानगरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | **महाराष्ट्र शासन,**<br>पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, राधानगरी |
| अभियोग पक्षातर्फे | | विशेष सरकारी वकील श्री. के. एम. भोसले |
| आरोपी | | **विक्रम गोपाळ पाटील**<br>वय वर्ष –३८, व्यवसाय – मजुरी<br>रा.आकनूर, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | ॲड.श्री.ए. एस. हुपरीकर |

**भाग–ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०२/०२/२०१६ |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :- | १६/०५/२०१६ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | २६/०९/२०१६ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०९/१०/२०१७ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | २१/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | २१/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. आरोपी निर्दोषमुक्त. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विक्रम गोपाळा पाटील | २७/०५/२०१६ | २७/०५/२०१६ | भा.द.वि.कलम २७९, ३३७, ३३८, ४२७, व मो.वा.का. कलम १८४, १३४(अ)(ब) अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य
## (पारीत दिनांकः२१/०५/२०२६)

भारतीय दंड विधान,१८६० चे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब) अन्वये आरोपीवर संपरीक्षा चालविण्यात येत आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत खालीलप्रमाणे:-**

२. दिनांक ०२/०२/२०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजताचे दरम्यान वर्दीदार मिलींद केरबा चव्हाण हे त्याच्या मोटरसायकल नं.एम.एच.०९.डी.व्ही.१७८४ वरुन तुरंबे येथुन त्यांचे गावी सोळांकूर येथे येत होते. त्यावेळी त्यांच्या मोटरसायकलवर पाठीमागील बाजूस त्यांचे वडील केरबा चव्हाण बसले होते. वर्दीदार त्यांच्या वर नमुद मोटरसायकल वरुन आकनुर गावचे हद्दीत पोहचले असता आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.०९.बी.पी.३९४२ हा हयगयीने, अविचाराने, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवून वर्दीदार यांच्या मोटरसायकलीस पाठीमागून धडक दिली. त्यामुळे वर्दीदार व त्यांचे वडील केरबा चव्हाण हे दोघेही मोटरसायकलीसह रस्त्यावर पडले. सदर अपघातामध्ये केरबा चव्हाण हे जखमी होवुन त्यांना गंभीर दुखापत झाली. तसेच वर्दीदार यांच्या मोटरसायकलचे देखील नुकसान झाले. सदर अपघातास आरोपी कारणीभूत झाल्याचे मोटर अपघात रजिस्टर नं.१९/२०१६ चे एकंदरीत झाले चौकशीत निष्पन्न झालेने तुकाराम कृष्णा चौगले, सहा. फौजदार राधानगरी पोलीस ठाणे यांनी आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीवरुन पोलीस ठाणे राधानगरी येथे आरोपी विरूद्ध गुन्हा क्र.५९/२०१६ भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मो.वा.का.कलम १८४, १३४(अ)(ब) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासीअंमलदार यांनी गुन्हयाचा तपास पुर्ण करुन आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपी विरूध्द भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मो.वा.कलम १८४, १३४(अ)(ब) प्रमाणे नि.क्र.८ कडे गुन्हयाचा तपशिल नोंदविला व आरोपीस त्याचे विरुद्ध असलेल्या गुन्हयाचा तपशिल समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे कथन केले व खटला चालविण्याची मागणी केली.

५. आरोपी विरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने वर्दीदार मिलींद चव्हाण (अ.सा.क्र.१) याची साक्ष नि.क्र.२६ कडे व जखमी साक्षीदार केरबा चव्हाण (अ.सा.क्र.२) यांची साक्ष नि.क्र.२७ कडे नोंदविली आहे. विशेष सरकारी वकील यांनी नि.क्र.३० कडे जखमी साक्षीदार यांच्या सहीची पुरसीस दाखल करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या वर नमुद साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यात आरोपी विरुध्द आरोप सदृश्य कथने न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसारचे निवेदन नि.क्र.१ वर आदेश करुन माफ करण्यात आले.

६. अभियोगपक्षातर्फे विशेष सरकारी वकील व आरोपीचे विद्वान वकिल यांचा युक्तीवाद ऐकला.

७. प्रस्तुत प्रकरणात खाली नमुद विचाराधीन प्रश्न माझे विचारासाठी पुढे आलेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष मी खाली नमुद कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०२/०२/२०१६ रोजी ०५.३० वाजताचे दरम्यान तुरंबे-सोळांकूर रोडवर, आकनूर, ता.राधानगरी येथील सार्वजनिक रस्त्यावर आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.०९.बी.पी.३९४२ हे वाहन मानवी जिवीतास धोका पोहोचेल अगर अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर नुकसान पोहचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे अथवा हयगयीने चालविले व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम २७९ अन्वये शिक्षापात्र अपराध केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.०९.बी.पी.३९४२ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे अथवा हयगयीने चालवुन मिलींद चव्हाण व केरबा चव्हाण यांच्या मोटरसायकलीस पाठीमागुन जोराची ठोकर देवुन त्यांचा अपघात करुन त्यांना दुखापत पोहचविली व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३३७ अन्वये शिक्षापात्र अपराध केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| ३. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.०९.बी.पी.३९४२ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे अथवा हयगयीने चालवुन समोरुन जाणारे मोटरसायकलीस पाठीमागुन जोराची धडक देवुन त्यावरील प्रवाशी जखमी केरबा चव्हाण यांना गंभीर दुखापत पोहचविली व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३३८ अन्वये शिक्षापात्र अपराध केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| ४. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.०९.बी.पी.३९४२ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे अथवा हयगयीने चालवुन समोरुन जाणारी मोटरसायकल नं.एम.एच.०९.डी.व्ही.१७८४ हीस पाठीमागुन जोराची धडक देवुन तिचे नुकसाणीस कारणीभूत ठरला व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ४२७ अन्वये शिक्षापात्र अपराध केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| ५. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.०९.बी.पी.३९४२ हे वाहन रस्त्याच्या | |

| | | |
|---|---|---|
| | परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे व धोकादायकरितीने चालविले व त्यान्वये मोटर वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| **६.** | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.०९.बी.पी.३९४२ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे अथवा हयगयीने चालवुन अपघात केला व सदर अपघाताची माहीती नजीकच्या पोलीस ठाणेत न देता तेथुन निघुन गेला व त्यान्वये मोटर वाहन अधिनियम कलम १३४(अ)(ब) अन्वये शिक्षापात्र अपराध केला असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| **७.** | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

८. आरोपीतर्फे प्रस्तुत प्रकरणातील जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र नि.क्र.२८ व घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२९ अशी कागदपत्रे मान्य केली आहेत.

## **<u>का र ण मि मां सा</u>**

**विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ६ बाबत**:–

९. विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ६ एकमेकांशी सुसंगत असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रितरित्या नोंदवित आहे.

१०. अभियोगपक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणात तपासण्यात आलेले मिलींद

(अ.सा.क्र.१) व केरबा (अ.सा.क्र.२) हे नमुद अपघातामधील प्रत्यक्षदर्शी व जखमी साक्षीदार आहेत. परंतु असे असुन देखील सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केलेले नाही. विशेष सरकारी वकील यांनी परवानगीनंतर सदर साक्षीदारांना उलटतपासातील उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु त्यांनी असे कथन केले की, त्यांना अपघातामधील ट्रॅक्टर कोण चालवित होते हे माहीत नाही. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले की, त्यांना हे माहीत नाही की आरोपीच्या चुकीमुळे अपघात झाला होता. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या उपरोक्त साक्षीदारांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केले नसल्याने विशेष सरकारी वकील यांनी सदर साक्षीदारांच्या सहीने पुरसीस नि.क्र.३० दाखल करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षाने दाखल केलेल्या पुराव्यावरुन हे शाबीत होत नाही की, घटनेच्या वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर नं.एम.एच.०९.बी.पी.३९४२ हे वाहन बेदरकारपणे व हयगयीने चालवुन जखमी यांच्या मोटरसायकलीस पाठीमागुन धडक देवुन त्यांचा अपघात केला व सदर अपघातामध्ये मोटरसायकलचे नुकसान करुन त्यांना साध्या व गंभीर दुखापती पोहचविल्या. तसेच अभियोगपक्षाने अभिलेखावर असा कोणताही पुरावा दाखल केला नाही की, आरोपीने अपघाताबाबत नजीकच्या पोलीस ठाणेमध्ये कोणतीही माहीती न देता तो घटनास्थळावरुन निघुन गेला. परिणामी, आरोपी विरुध्द भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मो.वा.कलम १८४, १३४(अ)(ब) प्रमाणे असलेले आरोप पुराव्याअभावी शाबीत होत नाहीत. सबब, मी विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ६ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन प्रश्न क्र.७ बाबत**:–

११. वर नमुद सर्व चर्चा व विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ६ चे निष्कर्ष लक्षात घेता आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## – आ दे श –

१. आरोपी विक्रम गोपाळा पाटील यास फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) प्रमाणे भारतीय दंड विधान,१८६० चे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटर वाहन अधिनियम कलम १८४, १३४(अ)(ब) नुसार शिक्षापात्र गुन्हयाच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा वैयक्तीक जात मुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) च्या तरतुदींचे अनुपालन करावे व त्यानुसार रक्कम रु.१५,०००/– चा वैयक्तिक व जमानत मुचलका निष्पादित करुन द्यावा.

*(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)*

RAJENDRA DHANAJI SHINDE Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE Date: 2026.05.21 15:42:03 +0530

ठिकाण : राधानगरी **( आर. डि. शिंदे )**

दिनांक :२१/०५/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

राधानगरी

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**१) अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी–**

**अ. अभियोग पक्ष साक्षीदारांची यादी**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | मिलींद केरबा चव्हाण | साक्षीदार | २६ |
| २. | केरबा सुभाना चव्हाण | जखमी साक्षीदार | २७ |

**ब. बचाव पक्ष साक्षीदारांची यादी– निरंक**

**क. न्यायालयीन साक्षीदारांची यादी– निरंक**

**२) अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)–**

**अ. अभियोग पक्ष निशाणी–निरंक**

**ब. बचाव पक्ष निशाणी– निरंक**

**क. न्यायालयातर्फे निशाणी–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ८ | आरोपीचे निवेदन |
| ३. | २८ | वैद्यकिय प्रमाणपत्र |
| ४. | २९ | घटनास्थळ पंचनामा |
| ५. | ३० | पुरावा बंद पुरसीस. |

**ड. सामग्री वस्तू –** निरंक